(२) 33

गोवा मुक्ती संग्रामामध्ये भाग घेतलेल्या स्वातंत्र्य सैनिकांच्या प्रकरणासंबंधी समिती नेमण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक:पीओअेस, १०८४/गो. मु. स./स्वा. सै. स./विक१. स्वासै,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक =३० एप्रिल १९८५.

शासन निर्णय :- गोवा मुक्ती संग्राम देशाच्या स्वातंत्र्य लढ्याचा भाग समजला जातो. म्हणुन या लढ्यामध्ये भाग घेतलेल्यांना इतर स्वातंत्र्य सैनिकांप्रमाणे पेन्शन व इतर सवलती मिळाव्यात अशा प्रकारचे अर्ज शासनाकडे प्राप्त झाले आहेत. तथापि याबाबतचे निकष वगैरे अद्याप न ठरल्या मुळे आतापर्यन्त या प्रकरणी निर्णय घेण्यात आलेला नाही. याबाबत दिनांक २४.७.८४ रोजी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समितीच्या बैठकीमध्ये असे ठरले की, ही प्रकरणे तपासून शिफारस करण्यासाठी दोन सदस्यांची समिती नेमावी. त्याप्रमाणे खालील सभासदांची समिती नेमण्यास शासन मंजुरी देत आहे.

१. श्री. जयवंतराव टिळक, सभापती, महाराष्ट्र विधान परिषद, अध्यक्ष
२. श्री. पी. के. सावंत, सदस्य

सदरहू समितीने गोवा मुक्ती संग्रामात भाग घेतलेल्या स्वातंत्र्य सैनिकांच्या खाली दर्शविलेल्या निकषांची पूर्तता करणाऱ्या प्रकरणांची तपासणी करुन शिफारस करावयाची आहे.

याबाबतचे निकष खालीलप्रमाणे असावेत.

१] ज्यांनी भारतीय सरहद्द ओलांडली आहे व पोर्तुगीजांच्या प्रदेशात प्रवेश केला आहे असे,

२. भारतीय सरहद्दीच्या पलिकडे अथवा भूमिगत गोवा मुक्ति संग्रामाच्या संदर्भात काम करीत असतांना ज्यांना मारखावा लागला, तुरुंगवास किंवा त्रास सोसावा लागला आहे असे,

३. भारतीय सरहद्दीच्या पलिकडे उघड अथवा भूमिगत राहून गोवा मुक्ति संग्रामाच्या संदर्भात काम केले आहे.

४. ज्यांनी कोणाच्या तरी स्वातंत्र्य सैनिकांच्या नेतृत्वाखाली काम केले आहे. नेत्याचे शिफारसपत्र तसेच हॉस्पिटलमधील कागदोपत्री पुरावा सादर आहे.

५. ज्यांची नावे गोवा मुक्ति संग्राम समितीच्या सत्याग्रहींच्या यादीत उपलब्ध आहे

६. ज्यांना यापुर्वी महाराष्ट्र शासनाने सन्मानपत्राव्दारे सन्मानित केलेले आहे अथवा गोवा मुक्ती स्वातंत्र्य सैनिक म्हणुन मान्यता दिलेली आहे.

७. ज्यांनी सरहद्द ओलांडली नव्हती परंतु अलिकडे राहून सत्याग्रहींच्या संघटने मध्ये राहून भूमिगत कार्य केले आहे.

वरील सातपैकी निकष क्र. १ व इतर पैकी कोणत्याही एक किंवा अनेक निकषांचा कागदोपत्री पुरावा जे सादर करतील व ज्यांची प्रकरणे सदरहू समितीने शिफारस केली असेल त्यांची प्रकरणे स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समितीपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात येतील.

या समितीच्या शासकीय अशासकीय सदस्यांना प्र चलित नियमाप्रमाणे प्रवास भत्ता व दैनिक भत्ता देण्यात यावा. [या शासन निर्णया सोबतचे जोडपत्र पहा:

शासनाचे अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग [रोख शाखा, यांना या समितीच्या अशासकीय सदस्यांच्या प्रवासभत्त्यांच्या बिलासंबंधी आहरण व संवितरण अधिकारी म्हणुन प्राधिकृत करण्यात येत आहे. हे× तसेच उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग [रोख शाखा] यांना त्या बिलावर प्रतिस्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यांत येत आहे.

या प्रस्तावावरील खर्च, "२५२-सेक्रेटरीएट व इतर सर्वसाधारण सेवा [२] सचिवालय मागणी क्रमांक या "अर्थसंकल्पीय शीर्षाच्या खर्च खाली टाकण्यांत यावा. व त्या खाली मंजूर ××××× केलेल्या अनुदानातून तो भागविण्यास यावा.

हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.-२८९/बीयुडी/१३, दिनांक ३०.४.८५ नुसार निर्गमित करण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सही/-
{द.म.[illegible]}
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे सचिव,
स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समितीचे सर्व सभासद,
श्री. जयवंतराव टिळक, सभापती, महाराष्ट्र विधान परिषद,
श्री. पी. के. सावंत,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य १, मुंबई,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी.